# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क. ०८ मोमिनपुरा येथील यंग मुस्लिम फुटबॉल ग्राउंड परिसरात
**{सा.बां.वि. झोन क्र. ०६}** चैन लिंग फेन्सींग व पेव्हिंग बॉक लावणे येथे स्थापत्य काम करण्यास्तव तयार करण्याकरिता रु. ४८,३१,४१३/- रक्कमेच्या प्राकलनास पद क्र. A४२००१३७४६०४ अंतर्गत प्रशासकीय मान्यता पद्रान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१. एकूण प्राकलन राशी रु. ४८,३१,४१३/- प्राकलनास मा. अधिक्षक अभियंता (सा.बां.) यांनी (दिनांक १२/०१/२०२४) तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.
२. या कामाचा खर्च पद क्र. A४२००१३७४६०४ अंतर्गत सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावित आहे.
३. सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 739/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 12/02/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, गांधीबाग झोन क्र. ०६ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क. ०८ मोमिनपुरा येथील यंग मुस्लिम फुटबॉल ग्राउंड परिसरात चैन लिंग फेन्सींग व पेव्हिंग बॉक लावणे येथे स्थापत्य काम करण्यास्तव तयार करण्याकरिता रु. ४८,३१,४१३/- रक्कमेच्या प्राकलनास पद क्र. A४२००१३७४६०४ अंतर्गत प्रशासकीय मान्यता पद्रान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.